चंद्रपूर येथे सैनिकी शाळेचे बांधकाम करण्यासाठी निधी वितरणास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः चंसैशा-२०१७/प्र.क्र.७९/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय , मुंबई - ३२
तारीख : १० नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u> - १) शासन निर्णय क्र. इसैशा-२०१७/प्र.क्र.७९/एसएम-६, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक १३.४.२०१७

२) शासन परिपत्रक क्रमांकः पूरक २०१७/प्र.क्र.९४/ अर्थसंकल्प-३ , वित्त विभाग, दिनांक ३०.६.२०१७

३) शासन निर्णय क्रमांक: अनुवि-४९१७/प्र.क्र.३२/अर्थसंकल्प, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २.८.२०१७

४) शिक्षणाधिकारी, जि.प., शिक्षण/माध्य/सैशाबां निधी/३४१५/२०१७, दिनांक २६.९.२०१७

<u>प्रस्तावना:-</u>

सातारा सैनिकी शाळेच्या धर्तीवर चंद्रपूर येथे नवीन सैनिकी शाळा सुरू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक ९/४/२०१५ च्या बैठकीत घेण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर, बल्लारपूर या मुख्य महामार्गावर भिवकुंड येथे सैनिकी शाळा प्रस्तावित करण्यात आली आहे. चंद्रपूर सैनिकी शाळेच्या परिसराला संरक्षण भिंत व अंतर्गत रस्ते बांधकामाच्या रू. १२.३६७७ कोटी इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०१७ च्या पावसाळी (जुलै) अधिवेशनात सदर बांधकामासाठी रु. १०.०० कोटी इतका निधी पुरवणी मागणीद्वारा उपलब्ध झाला आहे. चंद्रपूर सैनिकी शाळेच्या परिसराला संरक्षण भिंत, व अंतर्गत रस्ते बांधकामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी त्यांच्या दिनांक २६.९.२०१७ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार रु. ५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

चंद्रपूर सैनिकी शाळेच्या परिसराला संरक्षण भिंत, व अंतर्गत रस्ते बांधकामासाठी रु. १२३६.७७ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकापैकी रू. ५.०० कोटी (रुपये पाच कोटी फक्त) इतका निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात "मागणी क्रमांक ई-४, ४२०२-शिक्षण,क्रीडा, कला संस्कृती यावरील भांडवली खर्च, ०१ सर्वसाधारण शिक्षण, २०२-माध्यमिक शिक्षण, (०१)- सैनिकी शाळेचे बांधकाम, (०१)(०१) चंद्रपूर येथे सैनिकी शाळेचे बांधकाम, (४२०२ ६४३३), ५३ मोठी बांधकामे या लेखाशीर्षातून खर्ची टाकण्यात येईल. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सहायक संचालक(लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक,शिक्षण संचालनालय, पुणे यांना या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणा-या निधीकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ व क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ च्या परिपत्रकातील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. (४) येथील शासन परिपत्रक, दिनांक ३०.६.२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११०१५४५०५९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2017.11.10 15:32:44 +05'30'

(संगिता शेळके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४) जिल्हाधिकारी,चंद्रपूर
५) मुख्य कार्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
७) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, चंद्रपूर
८) उप सचिव (अर्थसंकल्प),शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई.
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर.

प्रत माहितीसाठी:-

१) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई-३२
२) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
३) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई-३२
४) उप सचिव (शाळा व्यवस्थापन),शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई-३२
५) निवड नस्ती (एस एम-६)